# बहुजन पत्रकारितेचा वारसा जपला



दै. 'पुढारी'चे मुख्य संपादक, पद्मश्री डॉ. प्रतापसिंह जाधव यांचा ७५ वा वाढदिवस साजरा होत आहे. ही कोल्हापूरच्या पत्रकारितेच्या तसेच सामाजिक चळवळीच्या इतिहासातील महत्त्वाची घटना आहे. दै. 'पुढारी'चे संस्थापक संपादक डॉ. ग. गो. जाधव यांच्या बहुजन पत्रकारितेचा वसा, वारसा तळमळीने त्यांनी जपला आहे. वृत्तपत्रसृष्टीतील त्यांचे योगदान अमूल्य असून लोकपत्रकार, लोकसंपादक म्हणून त्यांनी आपली प्रतिमा जपली आहे. सामान्यांच्या जिव्हाळ्याचे प्रश्न हाती घेऊन त्यासंदर्भात व्यापक लढा उभारण्याचे काम त्यांनी केले आहे. सामाजिक, शैक्षणिक व लोकपत्रकारितेच्या कार्यासाठी त्यांना दीर्घायुष्य लाभो या शुभेच्छा.

**- डॉ. डी. टी. शिर्के,**

कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रोबोटची निर्मिती अभिमानास्पद

## ऊर्जामंत्री नितीन राऊत यांचे गौरवोद्‌गार; 'तारा' रोबोटचे ई-अनावरण

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाने कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर निर्जंतुकीकरणासाठी रोबोटची निर्मिती करणे ही अभिमानाची बाब आहे, असे गौरवोद्‌गार राज्याचे ऊर्जामंत्री नितीन राऊत यांनी काढले.

विद्यापीठातील भौतिकशास्त्राचे संशोधक डॉ. राजेंद्र सोनकवडे यांनी 'यूव्ही-३६० सॅनिटायझर मॉड्युल'वर आधारित 'तारा' हा रोबोट निर्माण केला आहे. या रोबोटचे ई-अनावरण गुरुवारी ऊर्जामंत्री राऊत यांच्या हस्ते आणि उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत, राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे यांच्या ऑनलाईन उपस्थितीत झाले. मंत्री राऊत म्हणाले, कोरोना महामारीत दिलासा देणाऱ्या अभिनव संकल्पनांवर आधारित संशोधनाची देशाला नव्हे, तर जगाला मोठ्या प्रमाणात गरज आहे. अशा संशोधकांच्या पाठीशी शक्य ते



सर्व प्रकारचे पाठबळ उभे करू, अशी ग्वाही त्यांनी दिली.

उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत म्हणाले, शिवाजी विद्यापीठाकडून रोबोटिक तंत्रज्ञानावर आधारित संशोधन होणे अभिमानास्पद आहे. जगाच्या बरोबरीने भारत व महाराष्ट्र वाटचाल करत आहे याचे द्योतक आहे.

राज्यात रोबोटिक तंत्रज्ञानाचा विकास व प्रसार होण्यासाठी सकारात्मक दृष्टिकोनातून विचार करण्याची गरज आहे. उद्योग संचालनालयाचे आयुक्त डॉ. हर्षदीप कांबळे म्हणाले, यूव्ही व रोबोटिक तंत्रज्ञानाचा संगम करून त्याचा वापर निर्जंतुकीकरणासाठी करण्याचा प्रकल्प महत्त्वाचा आहे. विद्यापीठाची संशोधक टीम अभिनंदनास पात्र आहे. या प्रकल्पाच्या औद्योगिक उत्पादनासाठी आवश्यक ते सहकार्य करण्यात येईल.

यावेळी डॉ. राजेंद्र सोनकवडे यांनी प्रकल्पाविषयी माहिती दिली. नागपूर येथून युट्रॉनिक्स टेक्नॉलॉजीसचे संचालक रत्नदीप कांबळे, पवन खोब्रागडे, समीर रामटेके यांनी रोबोटची प्रात्यक्षिके सादर केली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी स्वागत केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

यावेळी उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे सचिव विजय सौरभ, विद्यापीठाचे वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे, प्रा. महेंद्र शिरसाठ, अमित किमटकर, सुबोध भालेराव, अनिकेत सोनकवडे उपस्थित होते.

# विद्यापीठे, महाविद्यालये टप्प्याटप्प्याने सुरू करावीत

## यूजीसीचे निर्देश

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) विद्यापीठे, महाविद्यालये सुरू करण्याबाबतची कार्यपद्धती जाहीर केली आहे. त्यानुसार सुरक्षित अंतर राखले जाण्यासाठी विद्यापीठे आणि महाविद्यालये टप्प्याटप्प्याने सुरू करण्यात येणार आहेत. संस्थेतील जागेच्या उपलब्धतेनुसार ५० टक्के विद्यार्थ्यांना आलटून-पालटून प्रवेश देण्यासह संसर्ग टाळण्यासाठी सुरक्षित अंतर, मुखपट्टीचा वापर, सतत हात धुणे किंवा निर्जंतूक करणे, वर्गखोल्या, सार्वजनिक वापराच्या जागांचे निर्जंतुकीकरण, बाधित आढळल्यास त्यांना विलग करण्यासाठीची व्यवस्था निर्माण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

करोना विषाणू संसर्गामुळे १६ मार्चपासून देशभरातील महाविद्यालये, विद्यापीठे आणि उच्च शिक्षण संस्था बंद आहेत. मात्र देशातील बाधितांचे प्रमाण नियंत्रणात येत असल्याने येत्या काळात महाविद्यालये, विद्यापीठे सुरू करण्याच्या दृष्टीने केंद्र सरकारकडून निर्णय घेतला जाऊ शकतो. या पार्श्वभूमीवर यूजीसीने विद्यापीठे, महाविद्यालये सुरू करण्यासाठीची कार्यपद्धती प्रसिद्ध केली आहे. संस्थेत प्रवेश देताना प्रत्येकाच्या शरीराचे तापमान मोजणे, मुखपट्टी, निर्जंतुकीकरण द्राव उपलब्धतेची तपासणी करणे आवश्यक आहे. ताप, खोकला, श्वास घेण्यास त्रास होत असलेल्यांना प्रवेश देऊ नये. विद्यापीठे, महाविद्यालयांनी नियमित निर्जंतुकीकरणासाठी कार्यप्रणाली निश्चित करावी. संशोधन विद्यार्थी आणि विज्ञान तंत्रज्ञान शाखेतील पदव्युत्तर पदवी विद्यार्थ्यांची संख्या तुलनेने कमी असल्याने आणि अंतराचे नियम पाळणे शक्य असल्याने त्यांना आधी प्रवेश द्यावा. तसेच शैक्षणिक आणि नोकरीच्या संधींचा विचार करून अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना बोलावता येईल. ऑनलाइन किंवा दूरस्थ शिक्षण प्रणालीला प्राधान्य देण्यात यावे, असे यूजीसीकडून स्पष्ट करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांमधील अस्वस्थता, ताण या बाबत समुपदेशकाच्या माध्यमातून नियमित संवाद असावा. सुरक्षित अंतर राखणे शक्य नसलेल्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येऊ नये. आवश्यकता असल्यासच वसतिगृह सुरू करावीत. मात्र खोलीत एकापेक्षा जास्त विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येऊ नये, असेही नमूद करण्यात आले आहे.

# दिवाळीनंतर महाविद्यालये सुरू होणार

## यूजीसीकडून हिरवा कंदील : महाविद्यालयातील प्रवेशासाठी हवी ५० टक्के उपस्थिती

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** दिवाळीनंतर म्हणजे १६ नोव्हेंबरपासून देशातील महाविद्यालये व शिक्षण संस्था सुरू करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) हिरवा कंदील दाखवला असून या संबंधित मार्गदर्शक सूचनाही जारी केल्या आहेत. जे विभाग कंटेनमेंट झोन नाहीत अशा विभागांतील महाविद्यालये टप्प्याटप्प्याने सुरू करावीत, अशी सूचना विद्यापीठ अनुदान आयोगाने केली आहे. सर्वात महत्त्वाचे, म्हणजे महाविद्यालयातील प्रवेशासाठी विद्यार्थ्यांच्या मोबाइलमध्ये आरोग्य सेतू ॲप असणे बंधनकारक असेल.

पहिल्या टप्प्यात संशोधक, पदव्युत्तर पदवी आणि अंतिम वर्ष विद्यार्थ्यांचे वर्ग सुरू करावेत, असेही आयोगाने बुधवारी प्रसिद्ध केलेल्या मार्गदर्शक सूचनांमध्ये म्हटले आहे. महाविद्यालये सुरू झाले तरी विद्यार्थ्यांना स्वेच्छा उपस्थितीची परवानगी द्यावी, असे आयोगाने स्पष्ट केले आहे. महाविद्यालयांतील एकूण विद्यार्थी संख्येच्या ५० टक्के विद्यार्थ्यांना महाविद्यालयांत प्रवेश द्यावेत, असेही यात म्हटले आहे. महाविद्यालये सुरू करण्यापूर्वी कॅम्पसचे निर्जंतुकीकरण करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. विद्यार्थी, कर्मचारी यांना मास्क लावणे बंधनकारक असेल.

### 'एकसमान नियम

प्रत्यक्ष महाविद्यालये सुरू झाले तरी विद्यापीठांनी ऑनलाइन शिक्षण सुरू ठेवावे. जेथे शक्य आहे

एका खोलीत एकाच विद्यार्थ्याला राहण्यास परवानगी द्यावी, असेही सांगण्यात आले आहे.

# शैक्षणिक संस्था, विद्यापीठे, कॉलेज उघडणार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

देशभरातील विद्यापीठांसह सर्व शैक्षणिक संस्था आणि महाविद्यालये सुरू होणार आहेत. विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) त्यासाठी विस्तृत मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. अनुदानित उच्चशिक्षण संस्था सुरू व्हाव्यात, यासाठी त्या-त्या संस्थेच्या प्रमुखांची तयारी असायला हवी. महाविद्यालयीन आवारात शारीरिक अंतर आणि मास्क वापरणे अनिवार्य असेल. प्रशासकीय कार्यालये, संशोधन प्रयोगशाळा आणि ग्रंथालये सुरू करणे याचा अंतर्भाव यात आहे. अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक कार्य आणि नोकरीसाठी संस्थाप्रमुखांच्या निर्णयानुसार प्रवेशाची परवानगी दिली जाऊ शकते. संस्थेतील उपस्थिती ५० टक्क्यांपेक्षा जास्त असू नये. विज्ञान-तंत्रज्ञान आणि संशोधन वगळता इतर सर्व कार्यक्रमांसाठी ऑनलाईन वर्ग सुरू राहतील. घरी ऑनलाईन अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन अध्ययन साहित्य आणि ई-संसाधने उपलब्ध करून देण्यासाठी संस्था प्रयत्न करेल. मर्यादित संख्येने वसतिगृहे उघडता येतील.

## यूजीसीच्या मार्गदर्शक सूचना जारी

# विद्यापीठ गुणवत्ता योजनेत वसंतदादा महाविद्यालयाचे यश

तासगाव : प्रतिनिधी

येथील पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालयातील वाणिज्य विभागातील विद्यार्थ्यांनी गुणवत्तेचा झेंडा शिवाजी विद्यापीठात फडकावला. शिवाजी विद्यापीठामार्फत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी दिल्या जाणाऱ्या शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती योजनेत शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये महाविद्यालयातील सर्वात जास्त विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. या अगोदर सलग दोन वर्षे कला विभागात महाविद्यालयाला प्रथम क्रमांक मिळाला होता. हीच परंपरा वाणिज्य विभागाने पुढे चालवली आहे.

प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांच्या मार्गदर्शनाखाली कॉमर्स विभागप्रमुख डॉ. अमोल सोनवले आपल्या सहकारी प्राध्यापकांच्या मदतीने जिद्दीने प्रयत्न करत आहेत. विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनण्यासाठी, उद्योजक बनण्यासाठी प्राचार्यांच्या सूचनेनुसार नवोपक्रम घेत आहेत. या यशाबद्दल महाविद्यालयातील या मुलांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे म्हणाले, गुणवत्तेची हीच परंपरा आपल्याला पुढे चालवायची आहे. डॉ. बापूजी साळुंखेंच्या या संस्कार केंद्राचे नाव जगभर पोहोचवायचे आहे. तासगावच्या द्राक्षाबरोबरच तासगावची गुणवत्ताही वाढवायची आहे.

# विद्यापीठात मास्क, सॅनिटायझरचे बंधन

नवी दिल्ली, ता. ५ : कोरोना लॉकडाउनच्या काळात बंद करण्यात आलेली विद्यापीठे व महाविद्यालये यांचे कामकाज सुरू करताना आज विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) सुधारित दिशानिर्देश जारी केले. त्यानुसार वर्गखोल्या, महाविद्यालयीन परिसर, प्रयोगशाळा, वाचनालये आदींमध्ये वावरणाऱ्या सर्वांना आरोग्य तपासणी, मास्क, सॅनिटायझरचे बंधन, वेळेवर मिळू शकणाऱ्या वैद्यकीय सेवेची उपलब्धता, सोशल डिस्टन्सिंग आदी आरोग्य नियम बंधनकारक असतील. वसतिगृहे सध्या सुरू करू नयेत आणि केली तर एका खोलीत दोन विद्यार्थ्यांच्या निवासाची व्यवस्था करू नये असेही स्पष्ट करण्यात आले आहे. यूजीसी दिशानिर्देशांनुसार त्या त्या भागातील कोरोना महामारीच्या परिस्थितीवर नजर ठेवताना कंटेन्मेंट विभागांतील महाविद्यालये बंदच ठेवावीत व त्या भागात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना- प्राध्यापकांना महाविद्यालयांत प्रवेश देऊ नये, असे बजावण्यात आले आहे.